| | |
|---|---|
| MHGO040008182022 | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव यांच्या न्यायालयात, ता. आमगांव.**<br>(पिठासीन अधिकारी श्री ए. आर. जोशी)<br>**[न्यायनिर्णय दि.०६/०५/२०२६]**<br>**नि.फ़ौ.ख.क्र. १३१/२०२२**<br>**कालावधीःव.०३,म.०९,दि.०४. नि. क्र.११** |
| | ( गुन्हा क्र. ३८७/२०२२, पोलीस स्टेशन, सालेकसा ) |

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र सरकारतर्फे**<br>पोलीस स्टेशन, सालेकसा,<br>ता. सालेकसा जि. गोंदिया. |
| **सहा. सरकारी वकील** | | **विधिज्ञ श्री एम. के. बोरीकर.** |
| **आरोपी** | | **गणेश भागवत शेंडे,**<br>वय– ४० वर्षे, धंदा– शेती मजूरी,<br>रा. दरेकसा ता. सालेकसा, जि. गोंदिया. |
| **आरोपी तर्फे वकील** | | **विधिज्ञ श्री एम. बी. यादव.** |

| | |
|---|---|
| **घटना घडल्याचा दिनांक** | दि. २७.०७.२०२२. |
| **प्रथम खबर अहवाल दिनांक** | दि. ३१.०७.२०२२. |
| **फिर्यादची तारीख** | दि. ३१.०७.२०२२. |
| **दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख** | दि. ०१.०८.२०२२. |
| **फिर्याद दाखल तारीख** | दि. ०२.०८.२०२२. |
| **आरोपीवर दोषारोप ठेवल्याची तारीख** | दि. ०२.०८.२०२२. |
| **पुरावा सुरू झाल्याची तारीख** | दि. २१.०२.२०२६. |
| **न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख** | –– |
| **न्यायनिर्णय तारीख** | दि. ०६.०५.२०२६. |
| **आरोपीला शिक्षा सुनावल्याची तारीख** | –– |

## आरोपीची माहिती

| | |
|---|---|
| आरोपीचे नाव | गणेश भागवत शेंडे, |
| अटकेची तारीख | दि. ३१.०८.२०२२. |
| आरोपीला जामिनावर सोडल्याची तारीख | दि. ०१.०८.२०२२. |
| दोषारोप | भा.दं.वी. कलम–३७९ प्रमाणे. |
| शिक्षा देण्यात आली कि निर्दोष सोडण्यात आले | निर्दोष सोडण्यात आले. |
| देण्यात आलेली शिक्षा | –– |
| आरोपी केस दरम्यान किती दिवस तुरूंगात होता | –– |

## साक्षीदारांची यादी / बचावपक्ष / कोर्ट साक्षीदार

अ) अभियोगपक्ष :

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच) |
|---|---|---|
| अ.सा.१ | लक्ष्मण गोसुजी नाईक, | फिर्यादी सा. क्र. ०१ (नि. क्र. १० ) |

ब) बचावपक्ष :

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर) |
|---|---|---|
| –– | –– | –– |

क) कोर्ट साक्षीदार:

| साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे नाव | साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर) |
|---|---|---|
| –– | –– | –– |

## अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ कोर्ट निशाणी क्र.

अ) अभियोगपक्ष

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | ११ | फिर्याद |

| | | |
|---|---|---|
| ०२ | १२ | छापील फिर्याद |

**ब) बचावपक्ष**

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) कोर्ट**

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड) मुद्देमाल**

| क्र. | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**:: न्या य नि र्ण य ::**

**(दिनांक ०६ मे २०२६ रोजी घोषीत)**

प्रस्तुत खटला हा भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९ अन्वये आरोपीविरुध्द दाखल करण्यात आला आहे.

०२. अभियोगपक्षाचे वतीने मांडण्यात आलेली वस्तुस्थिती खालील प्रमाणे.

फिर्यादी लक्ष्मण गोसुजी नाईक यांनी अशी फिर्याद दिली आहे की, दिनांक २७.०७.२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजतेच्या दरम्यान मौजा जमाकुळो ता. सालेकसा जि. गोंदिया येथे आरोपी नामे गणेश भागवत शेंडे याने कोणालाही न विचारता त्याच्या घरासमोर बांधलेल्या चार बकऱ्या अंदाजे किंमती ३०,०००/- रुपयेचा माल त्यांच्या संमती शिवाय चोरुन नेले. त्यामुळे त्यांनी आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन सालेकसा येथे तोंडी रिपोर्ट दिली.

०३. फिर्यादवरुन सालेकसा पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ३८७/२०२२ नोंदविण्यात आला व गुन्ह्याचा तपास पो. ना. दिनेश अशोक जांभुळकर यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान, त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा व साक्षीदारांची जबाब नोंदविली व तपासात

आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्याच्याविरुध्द तपासाअंती दोषारोपत्र दाखल केले.

०४. आरोपपत्रावरुन दखल घेऊन या न्यायालयाने आरोपीविरूध्द भा. दं. वि. कलम ३७९ अन्वये दोषारोप नि. क्र. ०३ अन्वये निश्चित केले. आरोपीने नि. क्र. ०४ वरील निवेदनाद्वारे दोषारोप मान्य नसल्याचे कळविले आहे व संपरीक्षेची मागणी केली.

०५. मी अभियोगपक्षाचे व आरोपीच्या वतीने त्यांचे विद्वान वकीलांचे म्हणणे ऐकले व न्यायपटावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता माझेपुढे काही मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे मी माझे निष्कर्षासह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक २७.०७.२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजतेच्या दरम्यान मौजा जमाकुळो ता. सालेकसा जि. गोंदिया येथे आरोपीने कोणालाही न विचारता फिर्यादीच्या घरासमोर बांधलेल्या एकुण चार बकऱ्या अंदाजे किंमती ३०,०००/– रुपयेचा माल त्याच्या संमतीशिवाय चोरून घेऊन जाण्याचा अपराध केला काय ? | नकारार्थी. |
| **२.** | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणीमिमांसा</u>

०६. अभियोगपक्षाने खटल्याच्या पृष्ट्यर्थ मात्र एक साक्षीदार तपासले आहे. फिर्यादी सा. क्र. १ लक्ष्मण गोसुजी नाईक यास नि. क्र. १० वर साक्ष नोंदविली. तसेच या न्यायालयाने नि. क्र. ०१ वर आदेश पारीत करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. अभियोगपक्षाच्या साक्षीपुराव्यात आरोपीविरुद्ध काहीही आले नसल्याने, नि. क्र. १ वर आदेश पारित करुन, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये आरोपीचे निवेदन वगळण्यात आले.

**<u>साक्षीपुरावाः–</u>**

०७. प्रस्तुत खटल्यातील फिर्यादी सा. क्र. १ लक्ष्मण गोसुजी नाईक यांनी त्याच्या सरतपासात असे कथन केले आहे की, तो आरोपीला ओळखतो. घटना ३ वर्षापूर्वी घडली होती.

त्यादिवशी तो संध्याकाळी घरी परत आल्यावर बकऱ्या घरी दिसल्या नाही. त्याबद्दल चरवा नामे दयाराम भोयर यांना विचारले असता त्यांनी आरोपीने त्याची बकऱ्या नेल्या असे सांगितले. त्याबद्दल आरोपीकडे विचारणा केली असता त्यांनी अपशब्द भाषेत त्यांना बोलणे शुरु केले. त्यामुळे त्यांनी आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली. सदर फिर्याद नि. क्र. ११ वर आणि छापिल फिर्याद नि. क्र. १२ वर आहे. त्यावर त्याची सही आहे आणि त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

०८. सदर साक्षदाराचे आरोपीतर्फे सविस्तर लटतपास घेण्यात आला. त्यात त्यांनी मान्य केले की, त्यांनी आरोपीला चोरी करताना पाहिले नाही. आरोपी व त्याचे चांगले संबंध आहे. तसचे त्यांना आरोपीविरुद्ध केस पुढे चालवायची नाही.

**<u>मुद्दे क्र. १ करिताः</u>–**

०९. एकंदरीत पुराव्याच्या अवलोकन केले असता असे दिसून येते की, अभियोगपक्षातर्फे पंच साक्षदार यांना तपासण्यात आलेले नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा सिद्ध झालेला नाही. तसेच फिर्यादी सा. क्र. १ लक्ष्मण गोसुजी नाईक यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, त्यांनी आरोपीला चोरी करताना पाहिले नाही. आरोपी व त्याचे चांगले संबंध आहे. तसचे त्यांना आरोपीविरुद्ध केस पुढे चालवायची नाही. त्यामुळे सदर साक्षदारांची साक्ष अभियोगपक्षास उपयोगी नाही असे माझे स्पष्ट मत आहे.

१०. उपलब्ध पुराव्याच्या अवलोकन केले असता फिर्यादीने जरी फिर्याद सिद्ध केली असली तरी त्यांनी आरोपीला चोरी करतांना पाहिले नाही. तसचे त्यांना आरोपीविरुद्ध केस पुढे चालवायची नाही. म्हणुन अभियोगपक्ष कथन करतो त्याप्रमाणे आरोपीने कोणालाही न विचारता फिर्यादीच्या घरासमोर बांधलेल्या एकुण चार बकऱ्या अंदाजे किंमती ३०,०००/– रुपयेचा माल त्याच्या संमतीशिवाय चोरून घेऊन जाण्याचा अपराध केला, ही बाब अभियोगपक्षाने निसंशयरित्या सिद्ध केले नाही. परिणामी, मी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करिताः</u>–**

११. प्राप्त परिस्थिती व मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष लक्षात घेवून मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नोंदवण्याकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>**आदेश**</u>

१. आरोपी **गणेश भागवत शेंदे** यांना भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९ अन्वये गुन्ह्याच्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७–अ अन्वयेची पुर्तता करावी.

३. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

Digitally signed by JOSHI ATUL RATNAKAR
Date: 2026.05.06 15:20:53 +0530

[ए. आर. जोशी ]

दिनांक : ०६.०५.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव.